दैनिक हेराल्ड मंगळवार, ३० मे २०१७

# 'बीबीए'च्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे वितरित

## व्यक्तिगत जीवनात व कामात समतोल महत्त्वाचा : डॉ. प्रिता मल्ल्या

वास्को, दि. २९(प्रतिनिधी) :

जीवनात आम्ही काही आवडीच्या गोष्टींमागे लागून जीवनाचा समतोल गमावून बसत असल्याचे प्रतिपादन मडगावच्या दामोदर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रिता मल्ल्या यांनी येथे एका कार्यक्रमात करून व्यक्तिगत जीवन व काम यांचा समतोल तसेच विवाह व कुटुंब यांच्या महत्त्वावर भर दिला.

येथील एम.ई.एस कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या बीबीए विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल त्यांना पदवी प्रमाणपत्रे वितरित करण्यासंबंधी सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी डॉ. मल्ल्या या प्रमुख पाहुण्या या नात्याने उपस्थित होत्या. व्यासपीठावर एम.ई.एस महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. आर. बी. पाटील, अभ्यासक्रमाच्या समन्वयक सेमेल सरदेसाई, गोवा मॅनेजमेंट असोसिएशनाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप साळगावकर, संचालक ललिता जोशी होते. याप्रसंगी बीबीए अभ्यासक्रमाचे ३२ जणांना व बीबीए शिपिंग व लॉजिस्टिकचे पाचजणांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात आली.

डॉ. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सेमेल सरदेसाई यांनी अहवाल वाचन केले. झिना वर्गिस हिने सूत्रसंचालन केले. वीराज महात्मे यांनी आभार मानले.




वास्को : बीबीए विद्यार्थ्यांसह डॉ. प्रिता मल्ल्या व इतर. (अक्षंदा)

लोकमत गोवा, गुरुवार, दि. १५ जून २०१७

# गणेश दैवज्ञ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मडगाव** : विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष आणि मडगावातील नामांकित सीए गणेश दैवज्ञ यांनी लिहिलेल्या 'अॅन ऑडिट ऑफ माय लाईफ' या पुस्तकाचे शुक्रवार १६ जून रोजी गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष नारायण बांदेकर यांच्या हस्ते विमोचन होणार आहे. हा सोहळा दामोदर कॉलेजच्या गणेश दैवज्ञ सभागृहात सायंकाळी ५ वा. होणार आहे. या वेळी सवलतीच्या दरात हे पुस्तक वाचकांसाठी उपलब्ध असणार आहे.


V.V.M.'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोवन वार्ता

शुक्रवार दि. १६ जून २०१७

# गणेश दैवज्ञ यांच्या आत्मचरित्राचे आज प्रकाशन

**मडगाव :** चार्टर्ड अकाऊंटंट असलेल्या गणेश दैवज्ञ यांच्या 'ॲन ऑडिट ऑफ माय लाईफ' या आत्मचरित्राचे प्रकाशन शुक्रवार, १६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता दामोदर कॉलेजमध्ये होणार आहे. १९५० साली हुबळी येथे स्थलांतर करणाऱ्या व १९६० च्या दशकात मडगाव शहराच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या दैवज्ञ यांनी आपल्या जीवनाचा आलेख या पुस्तकात मांडला आहे. पुस्तक प्रकाशन सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.





V.V.M.'s Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोवादूत : पणजी – शुक्रवार, १६ जून २०१७

# गणेश दैवज्ञ यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

मडगाव (प्रतिनिधी)




येथील सुप्रसिद्ध व अनुभवी चार्टर्ड अकाउंटंट गणेश दैवज्ञ यांनी लिहिलेल्या ' एन ऑडिट ऑफ माय लाइफ' या पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवारी १६ जून रोजी सायंकाळी ५ वा. सुप्रसिद्ध उद्योजक व गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष नारायण बांदेकर यांजहस्ते होणार आहे. तान्सोर कोंब येथील श्रीदामोदर शैक्षणिक संकुलातील गणेश दैवज्ञ ऑडिटोरियम मध्ये शुक्रवारी सायंकाळी ५ वा. हा कार्यक्रम होणार आहे. सदर पुस्तक सवलतीच्या दरात वरील ठिकाणी उपलब्ध असेल व त्यांतून मिळणाऱ्या रकमेतून ट्रस्टकडून गरजू मुलांना शिष्यवृत्त्या दिल्या जातील.

V.V.M.'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोमन्तक
पणजी, शनिवार,
१७ जून २०१७

# 'गणेश दैवज्ञ यांचे आत्मचरित्र युवा पिढीसाठी प्रेरणादायी'


सासष्टी, ता. १६ (प्रतिनिधी) : 'ॲन ऑडिट ऑफ माय लाइफ' या आत्मचरित्रातून गणेश दैवज्ञ यांच्या जीवन संघर्षाचे दर्शन घडत असून हे आत्मचरित्र युवा पिढीला निश्चितच प्रेरणा देईल, असे प्रतिपादन गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष नारायण बांदेकर यांनी येथे केले.

मडगाव येथील गोविंद रामनाथ कारे कायदा महाविद्यालयात आज सीए गणेश दैवज्ञ यांनी लिहिलेल्या 'ॲन ऑडिट ऑफ माय लाइफ' या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी ते प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते. यावेळी सन्मानीय अथिती म्हणून नावेलीचे आमदार लुइझिन फालेरो, मडगावचे आमंदार दिगंबर कामत, उच्च शिक्षण संचालक भास्कर नायक, सीए संदीप भांडारे, लेखक दत्ता नायक उपस्थित होते.

गणेश दैवज्ञ यांनी उद्योग आणि व्यापारात महत्वाची भूमिका बजाविलेली असून या आत्माचरित्रातून स्वतःला रेखाटण्याचा प्रयत्न दैवज्ञ यांनी केला आहे, असे बांदेकर पुढे म्हणाले.

गरीबीमुळे माणसाला जीवनाचे खरे महत्त्व कळून येते. परीश्रम केल्यास माणसाला फळाची प्राप्ती नक्कीच होते, असे उद्‌गार गणेश दैवज्ञ यांनी काढले. दुसऱ्यांपुढे आदर्श ठेवण्यासाठी हे आत्मचरित्र लिहिलेले नाही. स्वतःच्या जीवनाकडे असलेल्या संघर्षाचे दर्शन घडविण्याचा हा प्रयत्न आहे असेही ते म्हणाले.

गणेश दैवज्ञ यांची दृष्टी व्यापक आहे हे आपल्याला या आत्मचरित्रातून दिसून येते असे लुइझिन फालेरो सांगितले. युवा पिढीला शिक्षणाचे महत्व पटवून देणारे हे आत्मचरित्र असून युवकांनी या आत्मचरित्राचा आस्वाद घेणे महत्त्वाचे आहे, असे उद्‌गार भास्कर नायक यांनी काढले.




**मडगाव : गणेश दैवज्ञ यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन करताना नारायण बांदेकर. बाजूस संदीप भांडारे, लुईझिन फालेरो व भास्कर नायक.** (सोयरु कोमारपंत)

V.V.M.'s Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★


लोकमत
गोवा, बुधवार,
दि. २१ जून २०१७

## नारायण बांदेकर : 'अॅन ऑडिट ऑफ माय लाईफ' पुस्तकाचे प्रकाशन

# दैवज्ञ यांचे लिखाण मार्गदर्शी

लोकमत न्यूज नेटवर्क

अरविंद टेंगसे




'अॅन ऑडिट ऑफ माय लाईफ' या पुस्तकाचे प्रकाशन करताना नारायण बांदेकर. सोबत आमदार लुईझिन फालेरो, संदीप भंडारे, भास्कर नायक व लेखक गणेश दैवज्ञ.

**मडगाव** : ज्येष्ठ सी.ए. गणेश दैवज्ञ यांच्या 'अॅन ऑडिट ऑफ माय लाईफ' या आत्मचरित्रात संघर्षातून आपले जीवन कसे सावरले व संघर्षाच्या शिडीवरुन जीवनात यश कसे मिळविले याचा हिशोब सादर केला आहे, दैवज्ञ यांचे आत्मचरित्र हे आजच्या तरुणांसाठी यशाची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन उद्योगपती व गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष नारायण बांदेकर यांनी पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात केले. या वेळी व्यासपीठावर गोवा प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष व आमदार लुईझिन फालेरो, गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे भावी अध्यक्ष संदीप भंडारे व सेवानिवृत प्राचार्य भास्कर नायक उपस्थित होते.

दैवज्ञ यांनी आपल्या आत्मचरित्रातून आपल्या जीवन प्रवासाचे विविध पैलू उलगडून दाखविले आहेत. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यातील संघर्षाबरोबरच यशाचा आनंद कसा अनुभवला याचे चित्रण पुस्तकात असल्याचे बांदेकर म्हणाले. बांदेकर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

पुस्तकात आलेला आलेख ही त्यांच्या अनुभवाची शिदोरी असून संघर्षातून यशाचा मार्ग कसा मिळवावा याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे दैवज्ञ यांचा जीवन संघर्ष असल्याचे लुईझिन फालेरो म्हणाले.

भास्कर नायक व संदीप भंडारे यांनी गोव्यातील शैक्षणिक व चार्टर्ड अकाउण्टन्सी या क्षेत्रातील विकास व बदल यावर भाष्य केले.

मनोगतात गणेश दवैज्ञ यांनी आपल्या बालपणातील संघर्षाचा आलेख मांडला. जीवन हे सोपे व सरळ नसते; मात्र प्रयत्न केल्यास व कोणत्याही कार्यात तन मन धन ओतून कार्य केल्यास यश मिळते हे आपण अनुभवातून शिकलो असल्याचे सांगितले.

V.V. M'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

# मडगाव दामोदर महाविद्यालयात नेतृत्व प्रशिक्षण शिबिराला प्रतिसाद



मडगाव : दामोदर कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स महाविद्यालयात आयोजित नेतृत्व प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना फ्री एंटरप्राईज फोरमच्या संचालक स्वाती कपाडिया.

मडगाव, ता. ११ : विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्य निर्माण व्हावे, या उद्देशाने दामोदर कॉमर्स आणि इकॉनॉमिक्स महाविद्यालयात 'नेतृत्व प्रशिक्षण शिबिर' नुकतेच घेण्यात आले.

एम. आर. पै फौंडेशन आणि फोरम ऑफ फ्री एन्टरपाईज यांच्या सहकार्याने या दोनदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्यात फ्री एंटरप्राईज फोरमच्या संचालक स्वाती कपाडिया व एम. आर. पै फौंडेशनच्या हुफ्रीज बाटलीवाला उपस्थित होत्या.

प्राचार्य डॉ. प्रिता मल्ल्या यांनी स्वागत करून शिबिराचा हेतू सांगितला. प्रशिक्षणात शिकवल्या जाणाऱ्या नेतृत्व कौशल्यांचा उपयोग करावा, असे आवाहन केले. सचिन कामत आणि विवेक पत्की यांनी या शिबिरात प्रशिक्षण दिले. विद्यार्थी कौन्सिल निमंत्रक एडविन बॅरेटो यांनी सांगता सोहळ्यात विद्यार्थी व पाहुण्यांचे स्वागत केले. आरती परुळेकर या विद्यार्थ्यीनीने प्रशिक्षणातील सहाही सत्रांवर प्रकाश टाकत त्यातील वैशिष्टे व विद्यार्थ्यांना त्यांचा कसा उपयोग होईल यावर सुंदर विवेचन केले. विद्यार्थी कौन्सिलचे शिक्षक सदस्य सुमित कुमार यांनी आभार मानले. प्रशिक्षण शिबिराला विद्यार्थी कौन्सिलचे शिक्षक सदस्य प्रेक्षा चोपडेकर, सिनोला वाझ व पूर्वा गुडे उपस्थित होते.

GOMANTAK DATED - 12-07-2017

V.V.M.'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

The Navhind Times | Friday July 21, 2017

# NSS activities inaugurated at Damodar College

NT KURIOCITY

"It is the responsibility of each citizen particularly NSS volunteers to spread the message of the adverse effects of drug usage," said superintendent of police, Anti-Narcotics Cell, Goa Jeetendra Ranjan who was chief guest at the inaugural function of NSS activities at Shree Damodar College, Margao.

The inaugural function was chaired by college principal, Prita Mallya in the presence of principal of G R Kare College of Law, Saba Da Silva; vice principal, Sanjay Sawant Dessai, NSS chief programme officer, B P Sarath Chandran. There 200 NSS volunteers present at the function.

In her address Mallya emphasised the importance of selfless service to be rendered by NSS volunteers and their duties and responsibilities towards society. She also highlighted the various initiatives to be taken up by the NSS unit of the College during the academic year.

Ranjan highlighted various issues confronting society and appealed to NSS volunteers to be proactively involved in solving social problems. He made a detailed and informative presentation on the drug menace and its social, economic and health implications. He also stressed that it is the responsibility of each citizen particularly NSS volunteers to spread the message of the adverse effects of drug usage.

NSS activities inaugurated at Damodar College

NT KURIOCITY

"It is the responsibility of each citizen particularly NSS volunteers to spread the message of the adverse effects of drug usage," said superintendent of police, Anti-Narcotics Cell, Goa Jeetendra Ranjan who was chief guest at the inaugural function of NSS activities at Shree Damodar College, Margao.

The inaugural function was chaired by college principal, Prita Mallya in the presence of principal of G R Kare College of Law, Saba Da Silva; vice principal, Sanjay Sawant Dessai, NSS chief programme officer, B P Sarath Chandran. There 200 NSS volunteers present at the function.

In her address Mallya emphasised the importance of selfless service to be rendered by NSS volunteers and their duties and responsibilities towards society. She also highlighted the various initiatives to be taken up by the NSS unit of the College during the academic year.

Ranjan highlighted various issues confronting society and appealed to NSS volunteers to be proactively involved in solving social problems. He made a detailed and informative presentation on the drug menace and its social, economic and health implications. He also stressed that it is the responsibility of each citizen particularly NSS volunteers to spread the message of the adverse effects of drug usage.

Shree Damodar College of Com. MARGAO-GOA LIBRARY

The Navhind Times | Friday July 21, 2017

# Scratch programming workshop held at Damodar College

NT KURIOCITY



Department of computer science, VVM's Shree Damodar College of Commerce and Economics, Margao in collaboration with Computer Society of India (CSI), Goa Chapter organised a first-of-its-kind workshop for school children on 'Programming with Scratch'.

Scratch is a visual programming language designed by MIT, Massachusetts. The hands-on workshop created animation, stories and games, and witnessed enthusiastic participation of students between classes 6 and 9. Participants were provided with state-of-art laptops, necessary software and qualified instructors and student volunteers from the bachelor of computer applications (BCA) programme.

On the first day participants were introduced to the interface of the programming language. They learned to use sprites, design backdrops and mix sounds with movements of characters. On the second day participants got to work with multiple sprites and created games and animations. Day three had them learning to work with multiple backdrops with showing and hidings sprites, and keeping the objective of story creation.

Addressing the participants, chairperson of Computer Society of India (CSI), Goa Chapter, Shailaja Sardessai congratulated students for opting for the course and made them aware of the advanced tools that are available for students of their age group. Principal, Prita Mallya appreciated the animations and games designed by participants and distributed participation certificates.

MARGAO-GOA

oHeraldo A, WEDNESDAY, AUGUST 2, 2017

# Two-day Leadership Training Camp




**The Student Council of VVM's Shree Damodar College of Commerce and Economics,** Margao organised a two-day Leadership Training Camp in association with the renowned M R Pai Foundation and Forum of Free Enterprise, Mumbai last moth. The camp, organised to build up leadership skills among our youth, was attended by 62 students.

The inaugural session was attended by Swati Kapadia, Director, Forum of Free Enterprise and M R Pai Foundation and Hoofreez Batliwala. In her welcome address, Principal Dr Prita D Mallya welcomed the students and urged them to make the best use of the sessions to develop their personalities, leadership skills and team-building skills. Swati Kapadia spoke about the M R Pai Foundation and its activities, particularly among the youth. Expert trainers Sachin Kamath and Vivek Patki were also present.

The training camp was divided into six sessions, with each session focusing on important qualities that are required to develop the personality of the students and develop them as young leaders. The sessions were activity-based, involving games, group discussions, team work, etc.

V.V.M.'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

पुढारी | गोवा, शुक्रवार ४ ऑगस्ट २०१७

# विद्या विकास मंडळाचा ४६ वा वर्धापनदिन

**मडगाव : प्रतिनिधी**

विद्या विकास मंडळाचा यंदाचा ४६ वा वर्धापनदिन (दि.१ ऑगस्ट) मडगाव येथील जी.आर. कारे कायदा महाविद्यालयातील सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड इंडस्ट्रिजचे अध्यक्ष संदीप भांडारे यांच्यासह संस्थेचे संस्थापक सदस्य, मंडळ संचालित शिक्षण संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




**मडगाव : वर्धापनदिन सोहळ्यास प्रमुख पाहुणे गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संदीप भांडारे यांच्यासह उपस्थित संस्थेचे उपाध्यक्ष नितीन कुंकळ्येकर, गोकुळदास काणेकर, स्नेहल कामत, जॉन्सन फर्नांडिस, शशिकांत शेणई, मधुकर माल्ल्या, गणेश दैवाजना, शीला गावणेकर, प्रितम मोराईस, सायोनारा टेलिस लाड.**

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे आणि संस्थापक सदस्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष गणेश दैवाजना यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी मंडळाच्या शैक्षणिक प्रगतीच्या माहितीचे थोडक्यात सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व गोवा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संदीप भांडारे यांनी विद्या विकास मंडळाच्या संस्थापक सदस्यांचे अभिनंदन करून संस्थेच्या आतापर्यंतच्या प्रगतीबद्दल गौरवोद्गार काढले. सामाजिक क्षेत्रात शिक्षणाच्या माध्यमातून मोलाचे योगदान देण्यात संस्थेच्या सर्व सदस्यांचा मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे सचिव मधुकर माल्ल्या यांनी आभार मानले.

विद्या विकास मंडळ या संस्थेची नोंदणी दि. १ ऑगस्ट १९७१ रोजी झाली. संस्थेतर्फे श्री दामोदर कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड इकॉनॉमिक, रामकृष्ण महादेव साळगावकर उच्च माध्यमिक हायस्कूल, गोविंद रामनाथ कारे कायदा महाविद्यालय, विद्या विकास अकादमी (सीबीएसई) आणि एचएमएन गावणेकर इन्स्टिट्यूट ऑफ ट्रेनिंग अ‍ॅन्ड रिसर्च, या पाच शैक्षणिक संस्था चालविल्या जातात.

V.V.M.'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोमन्तक
पणजी, शुक्रवार
४ ऑगस्ट २०१७

# विद्या विकास मंडळाचा स्थापनादिन साजरा

मडगाव, ता. ३ : ज्ञानदानाचे श्रेष्ठ कार्य करीत असलेल्या विद्या विकास मंडळाचा ४६ वा स्थापनादिन उत्साहाने साजरा झाला. १९७१ साली नामवंत शिक्षणतज्ज्ञ बाळ गंगाधर टिळकांच्या पुण्यतिथीला विद्या विकास मंडळाची स्थापना झाली होती.

जी. आर. कारे लॉ कॉलेजमधील गणेश दैवज्ञ हॉलमध्ये १ ऑगस्टला झालेल्या कार्यक्रमाची सुरवात मुख्य पाहुणे व जीसीसीआय अध्यक्ष संदीप भांडारे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी विद्या विकासचे अध्यक्ष गणेश दैवज्ञ, खजिनदार शीला गावणेकर, २ रे उपाध्यक्ष प्रीतम मोराईस तसेच १ ले उपाध्यक्ष नितीन कुंकळेकर, सचिव मधुकर मल्ल्या उपस्थित होते. यावेळी विद्या विकासचे माजी विद्यार्थी विंग कमांडर स्नेहल कामत, जॉनसन फर्नांडिस, सीए शशिकांत शेणॉय व सायोनारा लाड यांनी समाजाला दिलेल्या सेवेबद्दल त्यांचे पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.



**मडगाव : १ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आलेल्या विद्या विकास मंडळाच्या ४६ व्या स्थापनादिनी (डावीकडून) १ ले उपाध्यक्ष नितीन कुंकळेकर, विंग कमांडर स्नेहल कामत, जॉनसन फर्नांडिस, सीए शशिकांत शेणॉय, सचिव मधुकर मल्ल्या, मुख्य पाहुणे व जीसीसीआय अध्यक्ष संदीप भांडारे, विद्या विकासचे अध्यक्ष गणेश दैवज्ञ, खजिनदार शीला गावणेकर, २ रे उपाध्यक्ष प्रीतम मोराईस व सायोनारा लाड.**

विद्या विकास मंडळाने चांगले शिक्षण देण्याचा मार्ग खुला केला असल्याबद्दल संदीप भांडारे यांनी त्यांचे अभिनंदन केले. सचिव मधुकर मल्ल्या यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

V.V.M's Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोवादूत : पणजी – शुक्रवार, ४ ऑगस्ट २०१७



श्री दामोदर कॉलेज वाणिज्य आणि अर्थशास्त्र, मडगावच्या एनसीसीच्या नौदल विभागाच्या विद्यार्थ्यांनी गुरुवारी गोवा विधानसभेला भेट देऊन अधिवेशनाचे कामकाज पाहिले. यावेळी त्यांनी नगरनियोजनमंत्री विजय सरदेसाई यांची भेट घेतली. सोबत एनसीसी कॅडेटस् ऑफिसर डॉ. सुब्रमह्मणम् भट.

V.V.M.'S. Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

THE TIMES OF INDIA, GOA
TUESDAY, AUGUST 8, 2017

## Vidya Vikas Mandal celebrated Founder's Day



Vidya Vikas Mandal celebrated the 46thFounder's Day recently at the Ganesh Daivajna Auditorium, G.R. Kare College of Law, Margao. Vidya Vikas Mandal was registered on 01st August 1971, to venerate the death anniversary of a renowned educationist, Shri. Bal Gangadhar Tilak. Vidya Vikas Mandal under its umbrella has five institutions namely, Shree Damodar College of Commerce and Economics, Ramacrisna Madeva Salgaocar Higher Secondary School, Govind Ramnath Kare College of Law, Vidya Vikas Academy (CBSE) and H.M.N. Gaunekar Institute of Training and Research.

V.V.M.'S. Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

oHeraldo GOA, WEDNESDAY, AUGUST 16, 2017

## Inauguration of NSS Activities

**The NSS activities of Shree** Damodar College of Commerce and Economics for the academic year 2017-18 were inaugurated last month. The chief guest for the function was Jeetendra Ranjan, Superintendent of Police, Anti-Narcotics Cell, Goa. The inaugural function was chaired by College Principal Dr Prita D. Mallya in the presence of Dr Saba Da Silva Principal, G R Kare College of Law, Vice-Principal Dr Sanjay Sawant Dessai, NSS Chief Programme Officer Dr B P Sarath Chandran along with 200 NSS volunteers.




Jeetendra Ranjan highlighted various issues confronting the society and appealed to NSS volunteers to be proactively involved in solving social problems. He made a detailed, informative presentation on the drug menace and its social, economic and health implications. He stressed that it is the responsibility of each citizen particularly NSS volunteers to spread the message of the adverse effects of drug usage.

V.V.M's Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
* LIBRARY *

# दामोदर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना आवाहन

**मडगाव :** श्री दामोदर महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष बी. कॉम आणि बी. सी. ए. च्या पाचव्या सत्र नियमित आणि पुन्हा परीक्षेला बसणाऱ्या आणि सहावे सत्र पुन्हा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करावे असे आवाहन करण्यात आले आहे. या संदर्भातील अधिक माहिती कॉलेजच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. श्रीमती प्रीता मल्ल्या यांनी दिली आहे.

TARUNBHARAT

Dated :- 22/08/2017

Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
LIBRARY

oHeraldo GOA, FRIDAY, SEPTEMBER 8, 2017

# INTERCOLLEGIATE GHUMAT AARTI COMPETITION



**The Cultural Council of VVM's Shree Damodar** College of Commerce and Economics, Margao, recently organised the 3rd inter-college *ghumat aarti* competition, 'Ghumat Sangram 2017'. This event was first structured with the aim of familiarising students with our lively traditions and culture through the medium of *ghumat aarti.*

Adesh Karwarkar, prominent local businessman and ex-student of Shree Damodar College, was the Chief Guest for the program. He emphasised on the importance of participating in *ghumat aarti* so as to keep our age-old traditions alive. The competition was judged by Suraj Pinge and Akshay Naik.

Fifteen colleges exhibited their talents at Ghumat Sangram. It was a keenly contested event, and the audience was treated to some outstanding performances by talented youngsters from all over the state. Goa College of Music, Altinho-Panjim won the first place while the second place was won by S S Dempo College, Cujira and DM's College, Mapusa secured the third place. Prizes included cash prizes amounting to Rs 5000, Rs 3000 and Rs 2000 respectively, trophies and certificates.

**Some special prizes were also distributed on the occasion:**

Best Ghumat Vadak – Akshay Naik, Goa College of Engineering, Farmagudi
Best Shamel Vadak – Gaurish Bakal, Dhempe College of Arts and Science, Miramar
Best Kasal Vadak – Sharmad Naik, Goa College of Music, Altinho-Panjim
Best Singer – Gayatri Patil, Government College of Arts, Commerce & Science, Khandola
Best Gajar – Rohan Naik, Narayan Zantye College of

V.V.M.'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोमन्तक
पणजी, रविवार
१७ सप्टेंबर २०१७




मडगाव : 'स्पेक्ट्रा २०१७-मॅजिक ऑफ आयटीव्यूड' या दामोदर कॉमर्स आयोजित कार्यशाळेत द्वितीय पारितोषिक घेताना चौगुले महाविद्यालयाचा आयटी संघ.

# स्पेक्ट्रा २०१७ : दामोदर कॉमर्सची आंतरमहाविद्यालयीन 'आयटी' कार्यशाळा

मडगाव, ता. १६ : दामोदर कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्सचे दोन दिवसीय राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन 'आयटी' कार्यशाळेचे आयोजन केले होते. 'स्पेक्ट्रा २०१७-मॅजिक ऑफ आयटीट्यूड' असे या कार्यशाळेचे नाव होते. महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाने आयोजित केलेल्या या कार्यशाळेत गोव्यातील बारा महाविद्यालयांनी आणि बीएस्सी व बीसीएच्या २३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध विभाग धुंडाळण्याचे कार्य या कार्यशाळेने केले. वर्गाच्या पलीकडील ज्ञान तसेच नेतृत्वगुण, संघगुण, निर्मिती आणि संभाषण कौशल्ये विकसित करणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता.

सुरवातीला पारंपरिक दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन झाले. यावेळी प्राचार्य डॉ. प्रीता मल्या, उपप्राचार्य डॉ. संजय देसाई, शर्मिला कुंदे, बीसीए समन्वयक एकता आगरवाल, स्पेक्ट्रा २०१७ चे समन्वयक सुमित कुमार, विद्यार्थी समन्वयक संदेश पालकोंडा आणि प्रत्येक सहभागी महाविद्यालयाचा एक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यशाळेत घेतलेल्या ऑनस्टेज, ऑफस्टेज, लॅब आणि गेमिंग कार्यक्रमांनी विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये प्राप्त करून दिली. आईसब्रेकर्स, थ्रॅशआऊट, अॅड मास्टेरो, ब्रेनस्टॉर्म, पेंट ओ फन, मिस्टरी मेज, सेकंड लाईफ, बग एक्सटरमिनेटर असे विविध कार्यक्रम, कोडी व स्पर्धा यावेळी घेण्यात आल्या. सांगता सत्राला गोवा टेक्नॉलॉजी असो. चे अध्यक्ष व उमंग टेक्नॉलॉजिजचे सीईओओ मांगिरीश सालेलकर मुख्य अतिथी होते. सहप्रायोजक असलेल्या केएपीईएसचे आशुतोष प्रभू यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. श्वेता वेरेकर यांनी या दोनदिवसीय कार्यशाळेचा अहवाल वाचला. सुमित कुमार यांनी आभार मानले.

V.V.M.'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

दैनिक हेराल्ड
बुधवार, २० सप्टेंबर २०१७

# विद्यार्थ्यांनी कोलवा किनारा केला स्वच्छ

## स्वच्छ भारत, स्वच्छ किनारेचा दिला संदेश

## टाकाऊ कचरा केला गोळा



**मडगाव:** श्री दामोदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना गोळा केलेला कचरा.

**मडगाव, दि. १९ (प्रतिनिधी) :**

मडगावातील श्री दामोदर महाविद्यालयाच्या सुमारे साठ एनसीसी नौदल कॅडेट तसेच एनसीसी अधिकाऱ्यांनी कोलवा समुद्रकिनाऱ्यावरील टाकाऊ कचरा गोळा केला. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नामुळे आंतरराष्ट्रीय वलय लाभलेल्या कोलवा समुद्रकिनाऱ्यावरील कचरा गोळा करून सफाई घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी हातभार लावला.

मडगावातील श्री दामोदर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा एनसीसी ऑफिसर मेजर संजय देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली किनारपट्टीची स्वच्छता करण्यात आली. त्यात प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक बाटल्या तसेच इतर टाकाऊ साहित्य मिळून सुमारे ३०० पिशव्या टाकाऊ कचरा गोळा करण्यात आला. 'स्वच्छ भारत', 'स्वच्छ किनारे' अशी घोषणा देत एकूण स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कचरा गोळा करण्याबरोबरच आपले एनसीसी कसबही विद्यार्थ्यांनी दाखवून 'स्वच्छता' मोहीम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या परीने योगदान दिले. 'प्लास्टिक कचरा' धोकादायक तसेच पर्यावरणावर वाईट परिणाम करणारा असल्याने, प्लास्टिक विरोधी संदेशही यावेळी देण्यात आला.

गोमन्तक

पणजी, मंगळवार,
३ ऑक्टोबर २०१७

## स्वच्छता मोहिम...




मडगाव : कोंब परिसरात स्वच्छता मोहीम राबवलेले दामोदर महाविद्यालयाचे छात्रसैनिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक. दामोदर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय देसाई व डॉ. शरथ चंद्रन यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही मोहीम राबवली. नगरसेवक केतन कुडतरकर यांनीही या स्वच्छता मोहिमेत भाग घेतला.

V.V.M'S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

oHeraldo
GOA, WEDNESDAY, OCTOBER 4, 2017

# SWACCH BHARAT ABHIYAN








Ketan Kurtarker, Councillor, MMC Ward No. 13 along with Sanjay Desai, Vice Principal and about 50 NCC cadets and NSS volunteers of Shri Damodar College of Commerce & Economics, (left) Councillor of Ward 24 of MMC along with Youth of ward 24 Gogal Housing Board and Bhatikar Model High School students cleaned Housing Board area while (right) Presentation Convent High School held a rally for awareness on "Swachata Hi Seva" on Gandhi Jayanti Day.

V.V.M.S Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

दैनिक हेराल्ड
बुधवार,
४ ऑक्टोबर २०१७

# मडगाव दामोदर महाविद्यालयात स्वच्छता मोहीम




मडगाव : स्वच्छता मोहिमेत सहभागी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

मडगाव, दि. ३ (प्रतिनिधी) :

मडगाव श्री दामोदर महाविद्यालयाच्या एनसीसी तसेच एनएसएस स्वयंसेवकांनी गांधी जयंतीनिमित्त 'स्वच्छ भारत' संकल्पेनला अनुसरून स्वच्छता मोहीम राबवली. कोंब येथील महाविद्यालय परिसरात ही मोहीम राबविण्यात आली.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात आली. त्यात एनीसी तसेच एनएसएस विभागाचे मिळून सुमारे शंभर विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रत्यक्षात स्वच्छता करण्याबरोबरच जागृतीवरही भर देण्यात आला. एनएसएस अधिकारी सरथ चंद्रन, विशाल च्यारी हेही या मोहिमेत सहभागी झाले होते. श्री दामोदर महाविद्यालयातर्फे यापूर्वी कोलवा येथील समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात टाकाऊ कचरा एकत्र केला होता. त्यात प्लास्टिकचाही मोठ्या प्रमाणात समावेश होता.

V.V. M's Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोवादूत : पणजी – गुरुवार, ५ ऑक्टोबर २०१७




गांधी जयंतीदिनी नगरसेवक केतन कुरकरकर यांनी राबविलेल्या स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले दामोदर महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# गांधी जयंतीदिनी कोंब येथे स्वच्छता मोहीम

मडगाव (प्रतिनिधी)

गांधी जयंती निमित्त सोमवारी स्वच्छ भारत अभियानाचा एक भाग म्हणून कोंब येथे स्वच्छता मोहीम स्थानिक नगरसेवक केतन कुरतरकर यांनी दामोदर महाविद्यालयाच्या सहकार्याने राबविली. यावेळी दामोदर महाविद्यालयाचे उपप्राचार्य संजय देसाई व महाविद्यालयातील एनसीसी तसेच एनएसएस विभागाचे सुमारे ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात स्वच्छतेसंदर्भात जागृती करण्यात आली. त्याशिवाय या परिसरात विशेष स्वरूपाने स्वच्छता केली गेली . स्वच्छ पर्यावरण विषयावर सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी लोकांमध्ये जागृती केली. या मोहीमेत काही स्थानिक नागरिकांनीही स्वतःहून भाग घेतला.

V.V. M.S. Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

oHeraldo
GOA, FRIDAY, OCTOBER 6, 2017

common room



## Yoga for good health

**The NSS unit of VVM's Shree Damodar College of Commerce & Economics, Margao** celebrated 3rd International Day of Yoga earlier in the year in the College Multipurpose Hall. The yoga day celebration was organised as per the direction given by the University Grants Commission (UGC). Around 250 NSS volunteers of the College participated enthusiastically in the celebration.

The hour-long programme began at 7:30 am with a prayer and chanting of Omkara. Sudhakar Naik, College Director of Sports & Physical Education and a trained yoga teacher, gave an introductory talk about the importance of Yoga in today's fast paced world. This was followed by yogic jogging by students and teachers. After yogic jogging, the participants performed several asanas, led by College sportspersons Bharti Prasad and Rajdeep Desai under the guidance of the yoga teacher. The asanas included Taadasana, Vrikshasana, Pada hastasana, Ardha Chakrasana, Trikonasana, Bhadrasana, Makarasana, Bhujangaasana, Sarvangasana, Pavana muktasana, Shavasana etc.

V.V.M's Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

The Navhind Times Friday December 1, 2017

# Damodar College inaugurates New Leo Club






**NT KURIOCITY**

Lions Club of Margao Central inaugurated its new Leo Club at Vidya Vikas Mandal's Shree Damodar College of Commerce and Economics, Margao.

The club was inaugrated MLA Digamber Kamat in the presence of multiple chairperson of Leos, Ularico Rodrigues; prinicpal Prita Mallya; president of Lions Club of Margao Central, Elston Fernandes, multiple GLT member, Nitin Maganlal and others.

Speaking at the inaugural function Kamat provided tips on how to be independent, get motivated, set goals and gain skills from the club. Mallya congratulated the students for joining the international organisation and seizing the opportunities of learning and leadership.

During the inauguration, Lions Club of Margao Central also felicitated teachers for having completed 35 years of service. Sudhakar Naik, Nirmala Gopinathan, Lydia Menon, Lia Fernandes, Maria Pimenta Borges and Saby Colaco were felicitated. Domnic Dias and Karen D'souza were felicitated for promoting para medical education as silent workers.

Maganlal conducted a two-hour individual development programme on communication skills and interpersonal relations to the inducted Leos. He highlighted various facts and tricks on communication skills and interpersonal relations, and also conducted a practical session.

# वाळपई येथे एन.सी.सी. शिबिराचा समारोप

**शिबिरात ४२७ मुलांचा सहभाग** | अवर लेडी ऑफ लुर्ड्स हायस्कूलमध्ये आयोजन

**प्रतिनिधी**
वाळपई

देशातील मुलांना एन.सी.सी. शिबिराच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत जेणेकरून येणाऱ्या काळात याचा अनुकूल परिणाम दिसून येईल. यामुळे तरुण पिढी नौदलाच्या सेवेत आपली सेवा समर्पित करण्यासाठी तयार होणार आहे, असे प्रतिपादन नौदलाचे गोवा राज्यातील लेफ्टनंट कमांडर गौरीश सावंत यांनी केले. गोव्यातील मुलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या एन.सी.सी. निवासी शिबिराच्या समारोप समारंभात ते बोलत होते. शिबिर वाळपईच्या अवर लेडी ऑफ लुर्ड्स हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर वाळपईच्या नगराध्यक्ष परवीन शेख, वाळपईच्या मुख्याधिकारी सिंथिया मिस्किता, अवर लेडी विद्यालयाचे मुख्याध्यापक पलासियो परेरा, फादर डॅनियल आफोन्सो, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष शबाना खान, आदींची खास उपस्थिती होती.

